# अधिसूचना

क्र. १४९/२०१४ दिनांक : ११/१२/२०१४

**विषय : वार्षिकांक स्पर्धा २०१४-२०१५**
संदर्भ : अधिसूचना क्र.६६/१९९४, दि.१७.११.१९९४

१. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये वर्ष १९८४-८५ पासून विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी प्रकाशित केलेल्या वार्षिकांकाची "वार्षिकांक स्पर्धा" आयोजित करण्यात येते. या स्पर्धेमध्ये सर्वोत्कृष्ठ ठरणा-या तीन वार्षिकांकास गुणानुक्रमे पारितोषिके प्रदान करण्यात येतात.

२. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार वर्ष १९९३-९४ पासुन महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेकरिता विद्यापीठाने व्यावसायिक आणि बिगर व्यावसायिक महाविद्यालये असे दोन वेगळे गट केलेले आहे. त्यानंतर व्यवस्थापन परिषद मुद्दा क्र.१६५, दि.९/७/२०१३ अन्वये या स्पर्धेतील प्रत्येक गटातील सर्वोत्कृष्ठ ठरणा-या वार्षिकांकास गुणानुक्रमे प्रथम रू.१०,०००/- , द्वितीय रू.५,०००/- व तृतीय रू.३,०००/- क्रमांकाचे पारितोषिक देण्याचे मान्य केले. तसेच समितीने विजेते महाविद्यालयांना स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देण्याचे ठरविले आहे.

३. गुणवत्ताक्रम ठरविण्याकरिता खालील निकषाप्रमाणे गुणांचे विभाजन राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | मुखपृष्ठ(प्रतिकात्मकता, निराळेपणा इ.) | ...... | १० गुण |
| ब) | अंतर्गत सजावट(आकर्षकता, व्यंगचित्रे, रेखाचित्रे इ.) | ...... | १० गुण |
| क) | छपाई व बांधणी | ...... | ०५ गुण |
| ड) | नाविन्य व वाचनियता | ...... | १० गुण |
| इ) | शाखा गट | | |
| | १) मराठी | ...... | २२ गुण |
| | २) हिंदी | ...... | १५ गुण |
| | ३) इंग्रजी | ...... | १५ गुण |
| | ४) संस्कृत | ...... | ०७ गुण |
| | ५) उर्दू | ...... | ०६ गुण |

४. वार्षिकांकात वाचनीय मजकूर (विविध भाषेतील अभिरूची संपन्न साहित्य/लेख, विविध अहवाल, व्यंगचित्रे, रेखाचित्रे व मुखपृष्ठ छायाचित्रासह) कमीत कमी ५० पृष्ठ असणे आवश्यक आहे व पृष्ठ क्रमांक सलग देण्यात यावे, त्याशिवाय वार्षिकांकाचा स्पर्धेसाठी विचार करता येणार नाही.

५. वार्षिकांकात अंतर्भूत लेखाच्या शिर्षानंतर लेखक, विद्यार्थ्याचे नाव व वर्ग स्पष्ट असावा. प्राध्यापकांचे लेख असल्यास 'प्राध्यापक' असे स्पष्टपणे नमुद करावे. वरिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी लिहीलेले लेख/साहित्य/कविता यांच्या पृष्ठांची संख्या कमीत कमी ५० पानांची असावी. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या लेखांची पृष्ठ संख्या स्पर्धेसाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

६. जाहिरातीचा अंतर्भाव करू नये. अंकात जाहिरातीचा अंतर्भाव असल्यास प्रति जाहिरात दोन गुण याप्रमाणे कमी केले जातील.

७. वार्षिकांक स्पर्धा २०१४-२०१५ मध्ये सहभागी होण्यासाठी वार्षिकांकाच्या ६ प्रती कुलसचिवांचे नावे दि.३०.६.२०१५ पर्यंत विद्यापीठास पोहोचतील अशा रितीने पाठविणे आवश्यक आहे. वार्षिकांकाची संख्या ६ प्रतींपेक्षा कमी असल्यास तसेच निर्धारित मुदतीनंतर प्राप्त वार्षिकांकाचा समावेश वार्षिकांक स्पर्धेमध्ये करण्यात येणार नाही.

८. वार्षिकांक स्पर्धेकरिता वार्षिकांक(आकार एक सारखा असण्याचे दृष्टीने) 11" x 8 1/2" आकाराचे असावे.
९. प्रत्येक महाविद्यालयाने स्पर्धेमध्ये सहभागी होणे अनिवार्य राहील.

१०. स्पर्धेसाठी परीक्षक समितीचा निर्णय अंतीम राहील.

स्वा/-
(दिनेशकुमार जोशी)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****